सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वन विभाग

# वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे कार्यालय

(नवीन प्रशासकीय इमारत, शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, नागपूर 440 001.)
email id : ccftnagpur@mahaforest.gov.in

**आदेश/ई-मेलव्दारे**

विषय : वनरक्षक (गट-क) संवर्गातून वनपाल (गट-क) संवर्गात पदोन्नती व पदोन्नतीने पदस्थापना.

क्रमांक : कक्ष-1/आस्था-अ/वनपाल पदो./प्र.क्र.334/24-25/4250

दिनांक : 03 मार्च, 2025

नागपूर वनवृत्तांतर्गत वनरक्षक (गट-क) संवर्गातून वनपाल (गट-क) संवर्गात पदोन्नती देण्यासंदर्भात विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक 28 फेब्रुवारी, 2025 रोजी संपन्न झालेली आहे. वनरक्षक (गट-क) संवर्गातून वनपाल (गट-क) संवर्गात वेतन मॅट्रीक्स मधील एस-9 : 26400-83600 या वेतन स्तर मध्ये तात्पुरत्या स्वरूपात खुल्या प्रवर्गात पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव (सर्वश्री) | पदोन्नतीचा प्रवर्ग | कार्यरत विभाग | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | दयाराम रामलाल राठोड | खुला | उपवनसंरक्षक, गोंदिया वन विभाग, गोंदिया | क्षेत्र सहायक कोका, वनपरिक्षेत्र अधिकारी कोका, उपसंचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र, साकोली | |
| 2 | चंद्रकांत रामकृष्ण गोदे | खुला | उपसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली. | वनपाल नवेगाव आगार, वनपरिक्षेत्र नवेगाव आगार, गोंदिया वनविभाग | |
| 3 | जिवनप्रकाश पुरुषोत्तम मेंढे | खुला | उपवनसंरक्षक, गोंदिया वन विभाग, गोंदिया | क्षेत्र सहायक पारशिवनी, वनपरिक्षेत्र अधिकारी पारशिवनी, नागपूर वनविभाग | |
| 4 | योगेश्वरी टोलीराम रहांगडाले (योगेश्वरी अरविंद पारधी ) | खुला | उपवनसंरक्षक, भंडारा वन विभाग, भंडारा | क्षेत्र सहायक मटकाझरी, वनपरिक्षेत्र अधिकारी, उत्तर उमरेड, नागपूर वनविभाग | |
| 5 | पुनम टोलीराम गौतम | खुला | उपसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली. | क्षेत्र सहायक चोरखमारा, वनपरिक्षेत्र अधिकारी उमरझरी, उपसंचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र, साकोली | |
| 6 | गौरीशंकर ईशनलाल लांजेवार | खुला | उपसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली. | क्षेत्र सहायक चिचदा, वनपरिक्षेत्र अधिकारी, रामटेक, नागपूर वनविभाग | |
| 7 | करुणा प्रेमानंद रामटेके | खुला | उपसंचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली. | क्षेत्र सहायक वडेगाव, वनपरिक्षेत्र अधिकारी तिरोडा, गोंदिया वनविभाग | |
| 8 | राजेश मारोतराव सुर्यवंशी | खुला | उपवनसंरक्षक, गोंदिया वन विभाग, गोंदिया | क्षेत्र सहायक अहमदनगर, वनपरिक्षेत्र अधिकारी कोंढाळी, नागपूर वनविभाग | |
| 9 | विनोद गोंविदराव राऊत | खुला | उपवनसंरक्षक, गोंदिया वन विभाग, गोंदिया | क्षेत्र सहायक नागलवाडी, वनपरिक्षेत्र अधिकारी खापा, नागपूर वनविभाग | |

वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालय नागपूर

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव (सर्वश्री) | पदोन्नतीचा प्रवर्ग | कार्यरत विभाग | पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 10 | ईश्वर लक्ष्मणराव सोनकुसरे | खुला | विवअ, सामाजिक वनीकरण, नागपूर | क्षेत्र सहायक तिरोडा, वनपरिक्षेत्र अधिकारी तिरोडा, गोंदिया वनविभाग | |
| 11 | सैय्यद मोस्सीर शाह सैय्यद अब्दुल मजीद शाह | खुला | उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | वनपाल वन्यप्राणी बचाव केंद्र, विभागीय व्यवस्थापक गोरेवाडा प्रकल्प, नागपूर | |
| 12 | सुनिल भगवानजी भोयर | खुला | उपवनसंरक्षक, नागपूर वन विभाग, नागपूर | क्षेत्र सहायक नागलवाडी, नागलवाडी एक संघ नियंत्रण, उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | |
| 13 | मिलींद यशवंतराव वनकर | खुला | उपवनसंरक्षक, नागपूर वन विभाग, नागपूर | क्षेत्र सहायक नागझिरा, वनपरिक्षेत्र अधिकारी नागझिरा, उपसंचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र, साकोली | |
| 14 | सुनिल नत्थुजी भुरे | खुला | उपवनसंरक्षक, भंडारा वन विभाग, भंडारा | क्षेत्र सहायक पेंढरी, वनपरिक्षेत्र अधिकारी कवडस (बफर), बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा | |
| 15 | दिपाली गोंविदराव रंभाडे (दिपाली प्रफुल कोहळे) | खुला | उपवनसंरक्षक, नागपूर वन विभाग, नागपूर | क्षेत्र सहायक आमगाव, वनपरिक्षेत्र अधिकारी न्यु बोर, बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा | |
| 16 | राधिका संपत झंवर (राधिका सतिश गडलिंगे) | खुला | उपवनसंरक्षक, कार्य आयोजना, नागपूर | क्षेत्र सहायक लोणारा, वनपरिक्षेत्र अधिकारी उमरझरी, उपसंचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखिव क्षेत्र, साकोली | |
| 17 | रविंद्र प्रभाकर हेडाऊ | खुला | उपवनसंरक्षक, नागपूर वन विभाग, नागपूर | क्षेत्र सहायक तिरखुरी-1, वनपरिक्षेत्र अधिकारी गोठणगांव, गोंदिया वनविभाग | |
| 18 | बबिता लक्ष्मणराव डोरले | खुला | विवअ, सामाजिक वनीकरण, भंडारा | क्षेत्र सहायक तिरखुरी-2, वनपरिक्षेत्र अधिकारी गोठणगांव, गोंदिया वनविभाग | |

1.1 संबंधितांना देण्यात येणारी पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब,दि.07 मे,2021 च्या शासन निर्णयाचे अधिन राहून देण्यात येत आहे. सदर पदोन्नत्या ह्या निव्वळ व तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाचे अधिन राहतील.

1.2 संबंधितांना देण्यात येणारी पदोन्नती ही उच्च न्यायालय, मुळ खंडपीठ, मुंबई येथे सुरू असलेल्या मुळ याचिका क्रमांक 8452/2004 व मा. औद्यागीक न्यायालय, नागपूर यांचेसमोर वनरक्षक संवर्गाच्या जेष्ठतेबाबत प्रलंबित न्यायालयीन प्रकरण तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ यांचे समोर नव्याने दाखल मुळ अर्ज क्रमांक 692/2019 या न्यायालयीन प्रकरणांच्या निर्णयाचे अधिन राहून देण्यात येत आहे. तसेच सदर पदोन्नती वनपाल संवर्गातील काही दावे/याचिका दाखल केल्या/झाल्या असल्यास त्या प्रलंबित याचिकांच्या अंतिम निर्णयाचे अधिन राहतील.

1.3 वनपाल संवर्गाच्या सर्व सेवा शर्ती संबंधितांना बंधनकारक राहतील.

1.4 मागासवर्गीय पदोन्नत कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जातीच्या दाव्यासंबंधी भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्यासाठी संबंधित कर्मचारी जबाबदार राहील व चौकशीत जर संबंधिताचा जातीचा

दावा खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करून त्यांना पदावनत करण्यात येईल.

2. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-1015/प्र.क्र.1/65/12, दिनांक 08-जुन-1995 अन्वये कालबध्द पदोन्नती व शासन निर्णय क्रमांक वेतन-1999/प्र.क्र.2/92/सेवा-3, दिनांक 20-जुलै-2001 अन्वये आश्वासित प्रगती योजना शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत ज्या कर्मचाऱ्यांनी कालबध्द पदोन्नतीचा व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतलेला आहे, अशा कर्मचाऱ्यांनी पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला कालबध्द पदोन्नतीचा किंवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ काढुन घेण्यात येईल.

3. या आदेशाव्दारे पदोन्नत करण्यात आलेले कर्मचारी ज्या तारखेला पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होतील त्या तारखेला त्यांची पदोन्नतीचे पदावर वेतन निश्चिती करण्यात येईल. तथापी, ज्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजनेंतर्गत किंवा आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वनपाल या संवर्गाची वरिष्ठ वेतन श्रेणी आधीच लागू करण्यात आली असेल, अशा कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती पुन्हा करण्यात येणार नाही.

4. पदोन्नत वनपाल सदर आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासून 7 दिवसांचे आंत पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू न झाल्यास संबंधितास पदोन्नतीची आवश्यकता नाही, असे गृहित धरून संबंधिताचे पदोन्नतीचे आदेश रद्द समजण्यात येईल.

5. .महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/का-12, दिनांक 12-सप्टेंबर-2016 अन्वये वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर पदोन्नती नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नाव निवड यादीतून काढून टाकण्यात येईल व पुढील 2 वर्षे होणाऱ्या निवड सूचिमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांच्या नावाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच त्यांना यापूर्वी आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ दिले असल्यास ते काढून घेण्यात येईल.

6. संबंधित **नियंत्रक अधिकारी यांनी पदोन्नत कर्मचारी यांचेविरूध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी/फौजदारी स्वरूपाचे प्रकरण अन्वेषणाधिन अथवा प्रलंबित नाही किंवा संबंधित कर्मचारी शिक्षेच्या अंमलबजावणी खाली नाही, याबाबत खातरजमा करूनच सदर आदेशाची अंमलबजावणी करावी**.

7. संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी उपरोक्त पदोन्नत वनपाल यांना त्यांचे पदोन्नतीने पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होणेस्तव दि.15.03.2025 च्या पुर्वी स्थानिक व्यवस्थेने तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावे.

8. उपरोक्त पदोन्नत वनपाल यांनी त्यांचे पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रूजू व्हावे. संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी संबंधित पदोन्नत वनपाल यांचा रूजू अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(श्रीलक्ष्मी. ए)
वनसंरक्षक (प्रादे.), नागपूर
वनवृत्त नागपूर

प्रति,
उपरोक्त सर्व कर्मचारी.
**मार्फत - संबंधित नियंत्रक अधिकारी**.

**प्रतिलिपी** - अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा., नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

**प्रतिलिपी** - वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, नागपूर/वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर माहितीस व आवश्यक कार्यवाहीस
उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया.
उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर/ नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली स्थित/बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा
उपवनसंरक्षक, नागपूर/भंडारा/गोंदिया/उपवनसंरक्षक (कार्य आयोजना), नागपूर.
विभागीय व्यवस्थापक, गोरेवाडा प्रकल्प, नागपूर
विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, नागपूर/भंडारा.
www.mahaforest.gov.in